# बृहन्मुंबई गणित अध्यापक मंडळ, मुंबई

दिनांक : 27–7–2013 **गणित संबोध परीक्षा २०१३** वेळ : 3 ते 5

इयत्ता : 5 वी एकूण गुण : 100

---

सूचना :– 1) प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका स्वतंत्र आहेत.
2) प्रत्येक प्रश्नासाठी उत्तरांचे चार पर्याय दिले आहेत. योग्य उत्तराचा फक्त पर्याय क्रमांक उत्तरपत्रिकेवर प्रश्नक्रमांकासमोर चौकटीत लिहा.
3) शाईने किंवा बॉलपेनने उत्तरे लिहा.
4) उत्तरपत्रिकेच्या मागच्या बाजूस कच्चे काम करा.
5) प्रत्येक प्रश्नाला दोन गुण आहेत.
6) खाडाखोड केलेल्या उत्तराला गुण दिले जाणार नाहीत.

---

1) विस्तारीत रुपात लिहिलेली संख्या लिहा.
$8 \times 1000 + 5 \times 100 + 7 \times 10{,}000 + 5 \times 10$
1) 87,550 2) 87,505 3) 78,550 4) 78,505

2) 63412 या संख्येत किती शतके आहेत ?
1) 04 2) 34 3) 634 4) 12

3) साडेसातच्या निम्मे किती ?
1) अडीच 2) पावणेचार 3) साडेतीन 4) दोन

4) सहा हजार तेरा + चार हजार एक + तीनशे बावीस = ?
1) 10,336 2) 10,363 3) 11,366 4) 11,603

5) सहा मीटर लांबीची रिबीन 11 ठिकाणी सारख्या अंतरावर कापल्यास झालेल्या प्रत्येक तुकड्याची लांबी किती ?
1) 45 सेमी. 2) 50 सेमी. 3) 65 सेमी. 4) 60 सेमी.

6) 11 पासून 26 पर्यंत सम संख्या किती ?
1) 6 2) 7 3) 9 4) 8

7) 7 + 7 + 7 + 7 + 7 ही संख्या गुणाकाराच्या स्वरुपात लिहा.
1) 7 × 5 2) 7 × 7 3) 35 4) 77777

8) $50 - 4 \times 7 + 22 = ?$
1) 344 2) 66 3) 44 4) 46

[ मागे पहा ]

9) 5 पुस्तकांची किंमत 60 रुपये आहे तर 11 पुस्तकांची किंमत किती ?

1) 132 रु. 2) 130 रु. 3) 140 रु. 4) 150 रु.

10) एका आयताची परिमिती 50 सेमी. आहे आणि त्याची लांबी 15 सेमी. आहे. तर त्याची रुंदी किती ?


1) 12 सेमी. 2) 10 सेमी. 3) 11 सेमी. 4) 15 सेमी.

11) सममूल्य अपूर्णांक होण्यासाठी चौकटीत बरोबर संख्या लिहा.

$$\frac{12}{31} = \frac{36}{\square}$$


1) 62 2) 83 3) 93 4) 71

12) आकृतीत एकूण रेखांकित भाग किती ते अपूर्णांकात लिहा.



1) $\frac{3}{10}$ 2) $\frac{10}{3}$ 3) $\frac{4}{11}$ 4) $\frac{2}{5}$

13) दिलेल्या समभुज त्रिकोणाची परिमिती लिहा.




1) 16 सेमी. 2) 8 सेमी. 3) 24 सेमी. 4) 64 सेमी.

14) पुढीलपैकी सममित आकृती कोणती ?

**L B F Q**

1) Q 2) L 3) F 4) B

15) एका वर्तुळाची त्रिज्या 7 सेमी. आहे तर व्यास किती ?

1) 3.5 सेमी. 2) 14 सेमी. 3) 1.4 सेमी. 4) 17 सेमी.

16) 24.519 या संख्येतील 5 या अंकाची स्थानिक किंमत किती ?

1) $\frac{5}{10}$ 2) $\frac{5}{100}$ 3) 50 4) 500

17) रिकाम्या जागी योग्य संख्या लिहा.

69 – ☐ = 37

1) 37 2) 22 3) 32 4) 23

18) रमेशने प्रत्येक 5 रु. प्रमाणे 3 पाकिटे आणि प्रत्येकी 50 पैसे प्रमाणे 15 पोस्टकार्डे घेतली. त्याने पोस्टमास्तरला 50 रु. ची नोट दिली. तर त्याला किती रक्कम परत मिळेल ?

1) 28 रु. 2) 25 रु. 3) 27 रु. 4) 27 रु. 50 पैसे

19) एका संख्येला 10 ने भागले असता भागाकार 16 येतो. बाकी 4 उरते. तर ती संख्या शोधा.

1) 160 2) 164 3) 64 4) 40

20) 160 मिनिटांचे तास व मिनिटात रुपांतर करा.

1) 2 तास 50 मि. 2) 3 तास 0 मि. 3) 2 तास 40 मि. 4) 1 तास 90 मि.

21) IX + XI = ?

1) XX 2) XII 3) XXII 4) IIXX

22) 19 × 8 = ?

1) 162 2) 152 3) 172 4) 144

23) $15 \frac{9}{100}$ ही संख्या दशांश चिन्हाचा उपयोग करुन लिहा.

1) 15.9 2) 15.09 3) 1.59 4) 0.159

24) तास काटा 10 आणि 11 च्या मध्ये आहे आणि मिनिट काटा 4 वर आहे तर किती वाजले ?

1) 10 वाजून 20 मि. 2) 11 वाजून 20 मि.
3) 10 वाजून 25 मि. 4) 11 वाजून 25 मि.

25) रिकाम्या जागी योग्य क्रमांक लिहा.

45, 39, 33, 27, ☐, ☐


1) 21, 16 2) 23, 17 3) 22, 16 4) 21, 15

[ मागे पहा ]

26) 12543 – 9012 = ?

1) 3551  2) 3515  3) 3531  4) 3501

27) पुढील आकृतीत क्रमाने येणारे लघुकोन, काटकोन, विशालकोन किती ?



1) 3, 2, 2  2) 2, 3, 2  3) 2, 2, 3  4) 3, 3, 1

28) एका वर्षी जून महिन्याची 30 तारीख सोमवारी होती तर त्या महिन्यात 1 तारीख कोणत्यावारी होती ?

1) रविवार  2) शनिवार  3) सोमवार  4) मंगळवार

29) "पंधरा हजार सातशे चौसष्ट" ही संख्या अंकात लिहा.

1) 15,674  2) 15,07,64  3) 15,764  4) 15,476

30) "आठची चारपट ही दहाच्या तीनपटीपेक्षा मोठी आहे" हे गणिती भाषेत कसे लिहाल ?

1) $4 \times 8 < 3 \times 10$  2) $8 \times 4 > 10 \times 3$

3) $8 \times 4 = 3 \times 10$  4) यापैकी नाही

31) पुढीलपैकी कोणत्या संख्येला 2, 3 आणि 5 ने निःशेष भाग जातो ?

1) 4150  2) 5250  3) 2350  4) 2025

32) दीपकने 7 तिकिटांसाठी 1540 रुपये दिले तर एका तिकीटाची किंमत किती ?

1) 215 रु.  2) 200 रु.  3) 210 रु.  4) 220 रु.

33) पुढील संख्या चढत्या क्रमाने लिहा.

$\frac{19}{21}, \frac{5}{21}, \frac{8}{21}, \frac{15}{21}$

1) $\frac{5}{21}, \frac{15}{21}, \frac{8}{21}, \frac{19}{21}$  2) $\frac{19}{21}, \frac{15}{21}, \frac{8}{21}, \frac{5}{21}$


3) $\frac{5}{21}, \frac{8}{21}, \frac{15}{21}, \frac{19}{21}$  4) $\frac{19}{21}, \frac{8}{21}, \frac{15}{21}, \frac{5}{21}$

34) 12 कि. ग्रॅम 250 ग्रॅम + 3 कि. ग्रॅम 750 ग्रॅम = ?
1) 16 कि.ग्रॅम 2) 15 कि.ग्रॅम 500 ग्रॅम 3) 16 कि.ग्रॅम 200 ग्रॅम 4) 15 कि.ग्रॅम





35) एका बॅगमध्ये पेनचे 15 खोके ठेवता येतात. तर 450 खोके ठेवण्यासाठी अशा किती बॅग लागतील ?
1) 28 2) 25 3) 30 4) 35

36) आशाने सकाळी 9 वाजून 15 मिनिटांनी प्रवास सुरू केला. तो दुपारी 1 वाजून 15 मिनिटांनं संपला तर तिने किती वेळ प्रवास केला ?
1) 3 ता. 30 मि. 2) 4 ता. 3) 4 ता. 15 मि. 4) 3 ता. 50 मि.

37) बाजूच्या वर्तुळातील सर्वात लहान जीवेचे नाव लिहा.
1) रेख BC 2) रेख MN
3) रेख OC 4) रेख AC




38) पुढीलपैकी दंडगोलाची आकृती कोणती ?

1) 
2) 
3) 
4) 

39) 2, 7, 8 हे अंक एकदाच वापरुन किती तीन अंकी विषम संख्या करता येतात ?
1) 4 2) 3 3) 2 4) 1

40) 67094 ही संख्या विस्तारित रुपात कशी लिहाल ?
1) 6 × 10000 + 7 × 100 + 9 × 10 + 4 × 1
2) 6 × 10000 + 7 × 1000 + 4 × 1 + 9 × 10
3) 4 × 10 + 9 × 100 + 7 × 1000 + 6 × 10000
4) यापैकी नाही

41) जर ए = एकक, द = दशक, श = शतक आणि स = सहस्र तर
45 ए × 2 = 9 ☐
1) एकक 2) दशक 3) शतक 4) सहस्र

42) 7 $\frac{3}{5}$ हा अपूर्णांक अंशाधिक रुपात लिहा.

1) $\frac{26}{5}$ 2) $\frac{5}{38}$ 3) $\frac{38}{5}$ 4) $\frac{5}{26}$

43) 55000 मिलिलिटर म्हणजे किती लिटर ?

1) 55 2) 550 3) 5.5 4) यापैकी नाही

44) भारतीय सौर वर्षातील पाचवा महिना कोणता ?

1) मे 2) आषाढ 3) श्रावण 4) आश्विन

45) 627 + 383 + 415 = ......... ?

1) 1,543 2) 1,542 3) 1,245 4) 1,425

46) 7007 या संख्येतील 7 या अंकाच्या दर्शनी किंमतीतील फरक ......... आहे.

1) 6093 2) 0 3) 693 4) 6993

47) माझ्याकडे 50 रु. च्या 4 नोटा, 20 रु. च्या 5 नोटा, 100 रु. च्या 3 नोटा आणि 10 रु. च्या 5 नोटा आहेत. तर माझ्याकडे एकूण किती रक्कम आहे ?

1) 500 रु. 2) 550 रु. 3) 650 रु. 4) 600 रु.

48) घनाकृतीला किती पृष्ठे असतात ?

1) 4 2) 8 3) 6 4) 12

49) पुढीलपैकी कोणते वर्ष लीप वर्ष आहे ?

1) 2014 2) 2010 3) 2016 4) 2018

50) रांगेमध्ये आर्या सातव्या क्रमांकावर उभी आहे आणि ती बरोबर मधे आहे तर त्या रांगेत एकूण किती विद्यार्थी आहेत ?

1) 18 2) 17 3) 12 4) 13